Prabhu Shri Ramchandra Shikshan Prasarak Mandal Tondgaon

Matoshri Shantabai Gote Art's, Commerce And Science College,Washim

(Naac Accredited With B Grade)

Activity Report

1) Title of the Activity : Literary Contributions of Annabhau Sathe and Lokmanya Tilak: A Seminar

2) SubTitle of the Activity : Annabhau Sathe and Lokmanya Tilak: A Seminar

3) Date of the Activity : 01Aug. 2025 (01 Day)

4) Organizing Dept. / Committee : Marathi

5) Name of the Chief Speaker : All Guests Name are included in report

6) Name of Guest : All Guests Name are included in report

7) Beneficiary of the Activity :Students & Staff

8) Participant Student :35 +

9) Number of SupportingTeacher : All Faculty's

10) Brief Report :

On August 1, 2025, a seminar on the literary contributions of Annabhau Sathe and Lokmanya Tilak was organized by the National Service Scheme (NSS) and the Department of Marathi at Matoshri Shantabai Gote Arts, Commerce, and Science College, marking the occasion of Lokmanya Tilak's death anniversary and Annabhau Sathe's birth anniversary. In his introductory remarks, Dr. D.N. Lanjewar outlined the contributions and achievements of Lokmanya Tilak and Annabhau Sathe. In his address, Dr. B.R. Tanpure provided a detailed overview of Lokmanya Tilak's four-point program: *Swadeshi*, *Swaraj*, *Boycott*, and National Education. Dr. V.A. Gaikwad shed detailed light on Annabhau Sathe's novel *Fakira*. He noted that Sathe's literature is rooted in a humanitarian perspective and addresses the injustices and atrocities faced by the exploited, the oppressed, nomadic communities, Dalits, and the working class. In his presidential address, Dr. Gajanan Kubde highlighted that Annabhau's literature championed a scientific outlook and noted his staunch opposition to superstition.

11) Program Photographs : Attached

12) Social Media Cutting / Link : --

13) Outcomes :

- Students were introduced to the lives and work of Lokmanya Tilak and Annabhau Sathe.
- . It helped in gaining an understanding of Lokmanya Tilak's journalism and patriotism.
- It is evident that the issues faced by Dalits, the oppressed, and the working class have been given a voice through the literature of Annabhau Sathe

Name & Signature of Faculty

Dr. Vishnu Namdeo Lande

MATOSHRI SHANTABAI GOTE ARTS, COM & SCI COLLEGE WASHIM

Principal

Dr. G.S.Kubade

Officiating Principal

Matoshri Shantabai Gote Arts Com & Sci College, Washim

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशीम

जि. वाशीम

मराठी विभाग

अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांचे साहित्यातील योगदान : चर्चासत्र

दि. 01 / 08 / 2025

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दि. 01 ऑगस्ट 2025 रोजी लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजना व मराठी विभागाच्या वतीने अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांचे साहित्यातील योगदान या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.एस. कुबडे हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ, बी.आर.तनपुरे व डॉ. व्ही.ए.गायकवाड यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमा पूजनाने झाली.

आपल्या प्रास्ताविकातून डॉ. डी.एन. लांजेवार यांनी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या कार्यकर्तृत्वाची ओळख करून दिली. आपल्या मार्गदर्शनात डॉ. बी.आर. तनपुरे यांनी लोकमान्य टिळक यांच्या स्वदेशी, स्वराज्य, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतु :सूत्रीची विस्ताराने ओळख करून दिली. डॉ. व्ही.ए. गायकवाड यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या 'फकिरा' या कादंबरीवर विस्ताराने प्रकाश टाकला. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे मानवतावादी दृष्टीकोणातून निर्माण झाले असून, त्यांच्या साहित्यातून शोषित, पीडित, भटक्या, दलित व कष्टकऱ्यांच्या अन्याय-अत्याचाराविरोधात लेखन झाले असल्याचे सांगितले. डॉ.विष्णू लांडे यांनी लोकमान्य टिळकांच्या केसरीतील अनेक निबंधावर प्रकाश टाकत, लोकमान्य टिळकांच्या जहालवादी विचारावर प्रकाश टाकला. याशिवाय अण्णाभाऊ साठे यांनी त्यांच्या साहित्यातून कामगार वर्गाच्या भूकेच्या प्रश्नाचे कसे चित्रण केले आहे त्यावरही प्रकाश टाकला. याशिवाय अण्णाभाऊंच्या शाहीरीतून इंग्रजांच्या जुलमी राजवटीचा खरपूसून समाचार घेतला असल्याचे त्यांनी सांगितले. आपल्या अध्यक्षीय मनोगतातून डॉ. गजानन कुबडे यांनी अण्णाभाऊंच्या साहित्यातून विज्ञानवादाची पाठराखण झाली असल्याचे सांगत, त्यांनी अंधश्रध्देला कडाडून विरोध केला असल्याचे नमूद केले. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दिलीप लांजेवार यांनी केले, तर उपस्थितांचे आभार कु. गायत्री सारसकर हिने मानले.

चर्चासत्राचे प्रास्ताविक करताना डॉ. डी.एन.लांजेवार

मार्गदर्शन करताना डॉ. विष्णू लांडे

मार्गदर्शन करतांना डॉ. बी.आर.तनपुरे

मार्गदर्शन करताना डॉ. व्ही.ए. गायकवाड

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना डॉ. जी.एस. कुबडे

उपस्थितांचे आभार मानतांना कु. गायत्री सारसकर